# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

'आविष्कार' या राज्यस्तरीय संशोधन स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'आविष्कार' पोर्टल विकसित करण्यात आलेले असून या पोर्टलवर स्टेज–१ अंतर्गत विद्यार्थ्यांकडून संशोधन विषयक संकल्पना ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या होत्या.

विषय तज्ज्ञांकडून सदर संशोधन विषयक संकल्पनांचे मूल्यमापन करण्यात आलेले असून पात्र संशोधन विषयक संकल्पनांचा समावेश स्टेज–२ मध्ये करण्यात आले होते. त्या विद्यार्थ्यांच्या संशोधन संकल्पनांचे स्टेज–२ साठी खालील प्रमाणे पोस्टर सादरीकरण व तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन दिनांक ०९/१२/२०१८ रोजी डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी पुणे. (पुणे जिल्हा अभियांत्रिकी व तंत्रज्ञानशाखे व्यतिरिक्त इतर सर्व शाखा), दि. १४/१२/२०१८ रोजी पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, रावेत, पुणे (पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील महाविद्यालये) व ए. आय. एस. एस. एम. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे. (पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरा व्यतिरिक्त पुणे जिल्हयातील महाविद्यालये) (पुणे जिल्हा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखा), दिनांक १५/१२/२०१८ रोजी के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक (नाशिक जिल्हा अभियांत्रिकी व तंत्रज्ञानशाखे व्यतिरिक्त इतर सर्व शाखा) दिनांक १५/१२/२०१८ रोजी कर्मवीर ॲड. बाबुराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक. (नाशिक जिल्हा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखा) आणि दिनांक १७/१२/२०१८ रोजी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, विळदघाट, जि. अहमदनगर, (सर्व विद्याशाखा) येथे घेण्यात आले.

'आविष्कार पोर्टल' वर स्टेज–२ चा निकाल जाहिर करण्यात आलेला असून स्पर्धकांना त्यांच्या लॉग–ईन मध्ये पाहण्यास उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. स्टेज–२ जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये उत्तीर्ण होवून स्टेज – ३ (विद्यापीठ स्तरीय) स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या स्पर्धकांना, पोस्टर तयार करणे, प्रवास व अनुषंगिक खर्चासाठी प्रत्येकी रु. १,०००/– (रु. एक हजार) अदा करण्यात येणार आहेत. तेव्हा स्टेज – ३ विद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी पात्र स्पर्धकांनी लॉग–ईन मधून त्यांच्या बँक खाते क्र. व बँकेची माहिती सादर करणे आवश्यक आहे.

तसेच संबंधित महाविद्यालयांनाही त्यांच्या महाविद्यालयातील स्पर्धक विद्यार्थ्यांचे निकाल खालील लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

avishkar.unipune.ac.in/ARC/Login.aspx

वरील लिंकवर गेल्यानंतर महाविद्यालयांनी त्यांचा PUN Code/BCUD Code व पासवर्ड वापरुन login करावे.

स्टेज–३ (विद्यापीठ स्तर) स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या स्पर्धकांसाठी गुरुवार दि. २७ डिसेंबर, २०१८ रोजी सकाळी १०:०० वाजता पासून वाणिज्य विभाग, आरोग्य केंद्रासमोर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेस येतांना स्पर्धकांनी त्यांना स्टेज – १ व स्टेज – २ च्या मूल्यकनांवेळी तज्ज्ञांनी केलेल्या सूचना विचारात घेऊन त्यांच्या संशोधन संकल्पनेचे पोस्टर ( १ मिटर X १ मिटर) व पावर पॉईट प्रझेंटेशन तयार करुन आणावयाचे आहे. कार्यशाळेमध्ये तज्ज्ञ संबंधित स्पर्धकांना त्यांचे पोस्टर व पावर पॉईट प्रझेंटेशन पाहून मार्गदर्शन करणार आहेत.

स्टेज – ३ (विद्यापीठ स्तर) स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या स्पर्धकांसाठी विद्यापीठ स्तर (University Level) स्पर्धा बुधवार दि. ०२ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी ०९:०० वाजता पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित करण्यात येत आहे.

मा. प्राचार्य/संचालक/विद्यापीठ विभाग प्रमुख/शैक्षणिक संशोधन समन्वयक यांना कळविण्यात येते की, आविष्कार स्पर्धेची स्टेज – ३ (विद्यापीठ स्तर) साठी पात्र ठरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांकडून त्यांच्या संशोधन संकल्पनांचे पोस्टर व पी.पी.टी.तयार करून घेऊन विहित वेळापत्रकाप्रमाणे संबधित विद्यार्थ्यांना संबंधित ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात यावे ही विनंती.

जा. क्र. आयक्युएसी/ 762 )
दि. २० डिसेंबर, २०१८ )
)

( डॉ. प्रफुल्ल पवार )
संचालक
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

१. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संल्गन महाविद्याये/मान्यताप्राप्त संस्था.
२. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
३. सहायक कुलसचिव, मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४. सहायक कुलसचिव, मा. प्र.कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.